**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

---


एमएमटीसी हाऊस, पाचवा मजला ई ब्लॉक , सी २२, वांद्रे- कुर्ला संकुल, वांद्रे (पुर्व),मुंबई ४०० ०५१

संकेतस्थळ- www.mahabocw.in
दुरध्वनी व फॅक्सक्र. ०२२-२६५७२६३१
ई-मेल bocwwboardmaha@gmail.com


---

जावक क्र. १२७० /२०२४
आरोग्य-२०२४/प्र.क्र.३५/योजना-०६

दिनांकः- 07 OCT 2024

**प्रति,**

१. **अप्पर कामगार आयुक्त,**
मुंबई कोकण विभाग/ पुणे/ नागपूर

२. **कामगार उप आयुक्त,**
नाशिक/अमरावती/छत्रपती संभाजीनगर

३. **सहायक कामगार आयुक्त/ सरकारी कामगार अधिकारी (सर्व जिल्हा कार्यालये)**

**विषय :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार व कुटुंबिय यांचेकरीता "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" अंतर्गत आई वडीलांचा समावेश करणेबाबत.**

**संदर्भ** :- १. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र. इबांका-२०२३/प्र.क्र७७/कामगार-७ दि.०७.०८.२०२३
२. शासन शुध्दीपत्रक उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. इबांका-२०२३/प्र.क्र.७७/कामगार-०७ दि.०९.०१.२०२४
३. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र. इबांका-२०२३/प्र.क्र.७७ (भाग-१) /काम-७ दि.१०.०७.२०२४
४. शासन निर्णय, उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग क्र. इबांका-०५२३/प्र.क्र.७७ (भाग-१)/कामगार-७ दि.१२.०७.२०२४
५. शासन शुध्दीपत्रक उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग क्र. इबांका-०५२३/प्र.क्र.७७(भाग-१)/कामगार-०७ दि.०१.१०.२०२४

**महोदय,**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदीत (सक्रिय) जीवित बांधकाम कामगारांची व त्यांचेवर अवलंबित कुटुंबामधील यथास्थिती पती/पत्नी आणि त्यांची १० वर्षावरील २ अविवाहीत अपत्ये यांची मे. एच. एच. एल. लाईफकेअर लिमिटेड (भारत सरकार उद्योग) यांचेमार्फत **"तपासणी ते उपचार" (Test to Treat) आरोग्य योजनेस** संदर्भिय (०१) ते (०४) अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

०२. शासन निर्णय दि.१२.०७.२०२४ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार व त्यांचे कुटुंबिय यांचेकरीता BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर रूग्णालय उभारणीव्दारे राबविण्यात येत असलेल्या **"तपासणी ते उपचार आरोग्य योजना"** मे. एच.एस.सी.सी. (इंडिया) लिमिटेड (भारत सरकार उद्योग) या संस्थेमार्फत राबविण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णय निर्णयातील परिच्छेद २ (अ) पुढीलप्रमाणे आहे.

**२ (अ)** "सदर योजनेअंतर्गत सर्व नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील पती अथवा पत्नी व १० वर्षावरील प्रथम दोन अपत्ये ही लाभार्थी म्हणून गणण्यात येतील."

०३. सदर योजनेत संबंधित बांधकाम कामगारांच्या आई वडीलांचा समावेश करणेबाबत वारंवार विविध संघटनेकडून मागणी प्राप्त होत असल्याने त्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. त्यास दि.०१.१०.२०२४ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये मान्यता प्राप्त झाली असून दि. १२.०७.२०२४ च्या शासन निर्णयातील २ (अ) मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करणेत आलेली आहे.

**(अ-१)** सदर योजनेअंतर्गत सर्व अविवाहित व विवाहित पुरूष नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील आई , वडिल , पत्नी व १० वर्षावरील प्रथम दोन अपत्ये, ही लाभार्थी म्हणून गणण्यात येतील.

**(अ-२)** सदर योजनेअंतर्गत सर्व अविवाहित महिला नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील आई व वडिल ही लाभार्थी म्हणून गणण्यात येतील.

**(अ-३)** सदर योजनेअंतर्गत सर्व विवाहित महिला नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील सासु , सासरे, पती व १० वर्षावरील प्रथम दोन अपत्ये, ही लाभार्थी म्हणून गणण्यात येतील.

आई व वडिलांचे नाते सिद्ध करण्याकरीता कुटुंबाचे रेशनकार्ड, आधार कार्ड,पॅन कार्ड यापैकी कोणताही एक पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.

सदर योजनेच्या अमंलबजावणीकरीता नियुक्त संस्थेने आई वडीलांचा तपशिल संगणक प्रणालीमध्ये घेणे बंधनकारक राहील.

०४. वरील शुध्दीपत्रकानुसार सदर योजनेचा लाभ आता संबंधित बांधकाम कामगार यथास्थिती पती/पत्नी, १० वर्षावरील दोन अपत्ये व आई वडील यांना देय आहे याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

०१/१०/२०२४

(विवेक कुंभार)
**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई.**

**प्रत** :-

१. मा. प्रधान सचिव, (कामगार), उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर
३. असोसिएट व्हाईस प्रेसिडेन्ट (मार्केटिंग) मे. एच. एल. एल. लाईफकेअर लिमिटेड, (भारत सरकार उद्योग) एच एल एल भवन पुजापुरा, तिरूअंनतपुरम, केरळ. यांना ऊचित कार्यवाहीस्तव
४. व्यवस्थापक,मे.एच. एस. सी. सी. (इंडिया) लिमिटेड, ई-६ (ए), सेक्टर-१, नौएडा (उ. प्र.) -२०१३०१ यांना ऊचित कार्यवाहीस्तव

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई अंतर्गत "नोंदीत सक्रीय (जिवीत) बांधकाम कामगार व त्यांचे कुटुंबियाकरीता" BOMT (Build Operate Manage Transfer) तत्वावर रूग्णालय उभारणीव्दारे "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविणेबाबत.- शुध्दीपत्रक

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांक: इबांका-०५२३/प्र.क्र.७७ (भाग-१)/कामगार-७**
मंत्रालय मुंबई - ४०००३२
दिनांक: ०१ ऑक्टोबर, २०२४

**वाचा :** (१) शासन निर्णय क्र.इबांका-०५२३/प्र.क्र.७७ (भाग-१)/कामगार-७, दिनांक १२.०७.२०२४

(२) सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.जा.क्र.११९७/२०२४/आरोग्य-२०२४/प्र.क्र.३५/योजना-०६, दिनांक ३०.०९.२०२४

**<u>शासन शुध्दीपत्रक :-</u>**

शासन निर्णय दिनांक १२.०७.२०२४ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्गत नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार व त्यांचे कुटुंबिय यांचेकरीता BOMT (Build Operate Manage Transfer) या तत्वावर रुग्णालय उभारणीद्वारे राबविण्यात येत असलेल्या "तपासणी ते उपचार आरोग्य योजना" राबविण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर शासन निर्णयामधील परिच्छेद २ (अ) पुढीलप्रमाणे आहे:-

२ (अ) "सदर योजनेअंतर्गत सर्व नोंदीत सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील पती अथवा पत्नी व १० वर्षावरील प्रथम दोन अपत्ये ही लाभार्थी म्हणून गणण्यात येतील."

**त्याऐवजी परिच्छेद २ (अ) पुढीलप्रमाणे वाचण्यात यावा:-**

२ (अ-१) सदर योजनेअंतर्गत सर्व अविवाहित व विवाहित पुरूष नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील आई, वडील, पत्नी व १० वर्षावरील प्रथम दोन अपत्ये, ही लाभार्थी म्हणून गणण्यात येतील.

२ (अ-२) सदर योजनेअंतर्गत सर्व अविवाहित महिला नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील आई व वडील ही लाभार्थी म्हणून गणण्यात येतील.

२ (अ-३) सदर योजनेअंतर्गत सर्व विवाहित महिला नोंदित सक्रिय (जिवित) बांधकाम कामगार तसेच, त्यांच्या कुटुंबामधील सासु, सासरे, पती व १० वर्षावरील प्रथम दोन अपत्ये, ही लाभार्थी म्हणून गणण्यात येतील. आई व वडीलांचे नाते सिद्ध करण्याकरीता कुटुंबाचे रेशनकार्ड, आधार कार्ड, पॅन कार्ड यापैकी कोणताही एक पुरावा सादर करणे बंधनकारक राहील.

तसेच योजनेच्या अमंलबजावणीकरीता नियुक्त संस्थेने आई-वडीलांचा तपशिल संगणक प्रणालीमध्ये घेणे बंधनकारक राहील.

२. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४१००११६५०४७८४१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DEEPAK UTTAMRAO POKALE

Digitally signed by DEEPAK UTTAMRAO POKALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY AND LABOUR DEPARTMENT,
2.5.4.20=856b31c793b12e4f22cb247c5cff7f3358867f2482aa2234f6131bf8940dbd2e, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=F4163205E7B4960CC7CA6F973D6DEB06502B2E8FC47A411BABCF42A0E99CF34B, cn=DEEPAK UTTAMRAO POKALE
Date: 2024.10.01 16:37:36 +05'30'

**( दिपक पोकळे )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव राजभवन,मुंबई.
२. मा.सभापती, महाराषट्र विधानपरिषद, विधानमंडळ, मुंबई.
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ, मुंबई.
४. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. उप मुख्यमंत्री (गृह), मंत्रालय, मुंबई
६. मा. उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन), मंत्रालय, मुंबई
७. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व विधीमंडळ सदस्य
१०. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव राजभवन,मुंबई
११. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव, विधानमंडळ, मुंबई.
१३. विकास आयुक्त, असंघटीत कामगार, मुंबई.
१४. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५. सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई.
१६. निवड नस्ती (कामगार-७)